# शतकोत्तर आश्वासक वाटचाल ..... सभासदहिताची !

१०४ वा

## वार्षिक अहवाल

सन २०२२-२०२३

# अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि.,अहमदनगर




मुख्य कार्यालय : ऐक्य मंदिर, आनंदी बाजार, अहमदनगर

# क्षणचित्रे...




मा.ना.डॉ. भागवतजी कराड, केंद्रीय राज्यमंत्री यांना राहाता शाखा मागणी बाबतचे निवेदन देतांना चेअरमन श्री. संदीप मोटे, जिल्हाध्यक्ष राजकुमार साळवे, संचालक कारभारी बाबर व इतर मान्यवर

राज्यस्तरीय सहकार परिषद व कृतज्ञता सन्मान सोहळा २०२३ मा. सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांचा सन्मान करताना समवेत मा.ना.श्री राधाकृष्ण विखे पाटील, महसुलमंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रसिद्ध व्याख्याते गणेश शिंदे, जिल्हाध्यक्ष शिक्षक संघ बापुसाहेब तांबे, चेअरमन संदीप मोटे, मा.चेअरमन अर्जुन शिरसाट, नारायण पिसे



अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेला यावर्षीचा बँको पुरस्कार मिळाला सदर पुरस्कार स्विकारताना व्हा. चेअरमन श्री. कैलास सारोके, संचालक सर्वश्री रमेश गोरे, भाऊराव राहिंज, बाळासाहेब सरोदे, बाळासाहेब तापकीर, ज्ञानेश्वर शिरसाट





मा.शिवजीराव कर्डीले यांची अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सह बँकेच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल सन्मान करताना कार्य. चिटणीस जिल्हा संघ नारायण पिसे, संचालक महेंद्र भणभणे, माजी चेअरमन संतोष दुसुंगे. शिक्षकनेते बाळासाहेब कापसे, विजय नरवडे, आदिनाथ सातपुते, नितीन पंडीत, गोरख तोडमल, गोरख वाबळे, पवार व मुजबळ.

मा.श्री. पोपटराव पवार यांना भारत सरकार तर्फे पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सन्मान करतांना जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष मा.श्री. बापुसाहेब तांबे, गुरुमाऊली मंडळाचे अध्यक्ष श्री. राजकुमार साळवे, शिक्षक बँकेचे चेअरमन श्री. संदीप मोटे ,बँकेचे संचालक सर्वश्री महेंद्र भणभणे, सुर्यकांत काळे तसेच समवेत बाळासाहेब कापसे, उपशिक्षणाधिकारी जयश्री कार्ले मॅडम, सुरेश कार्ले, विजय ठाणगे, बाबासाहेब पवार, शिवाजी गोहड, प्रकाश नांगरे, साहेबराव कदम, भाऊसाहेब ठाणगे, गणेश पिंपळे, बापु दुंडे, बबन मते, अभय ठाणगे, दत्ता सिनारे, संजय गारुडकर, भाऊसाहेब नगरे हे उपस्थित होते.






बँकेच्या सभासद श्रीम. उषा गागरे यांची कन्या कावेरी व अभिजीत यांच्या शुभविवाह प्रसंगी राहुरी शाखेच्या वतीने रू. ११,०००/- शुभमंगल योजनेचा चेक प्रदान करताना राज्याचे नेते मा. मंत्री मा.ना. बाळासाहेब थोरात साहेब, समवेत मा. चेअरमन श्री. साहेबराव अनाप, संचालक गोरक्षनाथ विटनोर, विश्वस्त सर्वश्री विठ्ठलराव काकडे, मुकेश गडधे, चांगदेव काकडे, रविकिरण साळवे, अनिल शिंदे, निवृत्ती धुमाळ, नारायण सरोदे, संजय चौधरी, नामदेव दातीर,



शिक्षिका साहित्य संमेलन प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा खासदार सौ.सुप्रियाताई सुळे, आमदार श्री. रोहित पवार यांचे स्वागत करताना तत्कालीन राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष काकासाहेब तापकिर, बँकेचे माजी चेअरमन शरद सुद्रिक, संचालक बाळासाहेब तापकिर समवेत सौ. हराळ, सौ. सुर्यवंशी, सौ. पंडीत, सौ. सोनवणे व इतर



या भुमंडळाचे ठायी
तुज जैसा होणे नाही...

# स्फुर्तीस्थान



## कै. भा. दा. पाटील

आपला आदर्श आम्हास स्फुर्ती देणारा...

# आधारस्तंभ



**मा.नामदार राधाकृष्ण विखे पा.**
महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा. सुजय विखे पा.**
खासदार



**मा. सदाशिव लोखंडे**
खासदार



**मा.सौ. रोहिणीताई शेंडगे**
महापौर, म.न.पा. अहमदनगर



**मा. शिवाजीराव कर्डीले**
अध्यक्ष, जिल्हा सहकारी बँक, अ.नगर



**मा. आशिष येरेकर**
मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. अ.नगर



**मा. गणेश पुरी**
जिल्हा उपनिबंधक सह. संस्था, अ.नगर



**मा. भास्कर पाटील**
शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. अ.नगर

# संचालक मंडळ

(दि. १८/१०/२०२२ पासून)

चेअरमन



**श्री. संदीप मोटे**

व्हा.चेअरमन



**श्री. कैलास सारोक्ते**



**श्री. भाऊराव राहिंज**
संचालक



**श्री. महेंद्र भणभणे**
संचालक



**श्री. सुर्यकांत काळे**
संचालक



**श्री. शशिकांत जेजुरकर**
संचालक



**श्री. योगेश वाघमारे**
संचालक



**श्री. बाळासाहेब सरोदे**
संचालक



**श्री. संतोषकुमार राऊत**
संचालक



**श्री. कल्याण लवांडे**
संचालक



**श्री. गोरक्षनाथ विटनोर**
संचालक

# संचालक मंडळ

(दि. १८/१०/२०२२ पासून)



**श्री. रमेश गोरे**
संचालक



**श्री. आण्णासाहेब आभाळे**
संचालक



**श्री. रामेश्वर चोपडे**
संचालक



**श्री. बाळासाहेब तापकिर**
संचालक



**श्री. माणिक कदम**
संचालक



**श्री. शिवाजी कराड**
संचालक



**श्रीम. सरस्वती घुले**
संचालिका



**श्रीम. निर्गुणा बांगर**
संचालिका



**श्री. कारभारी बाबर**
संचालक



**श्री. ज्ञानेश्वर शिरसाट**
संचालक



**श्रीम. मिनाज शेख**
स्विकृत संचालिका



**श्री. दिलीप मुरदारे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

# संचालक मंडळ

(दि. १/४/२०२२ ते १७/१०/२०२२ पर्यंत)


श्री. किसनराव खेमनर
चेअरमन


श्री. सुयोग पवार
व्हा.चेअरमन


श्री. गंगाराम गोडे
(से.निवृत्त ३१/०५/२०२२)


श्री. सलिमखान पठाण


श्री. बाबासाहेब खरात


श्री. राजु राहाणे


श्रीमती उषा बनकर


श्री. शरद सुद्रीक


श्री. अर्जुन शिरसाठ


श्री. संतोष दुसुंगे


श्री. साहेबराव अनाप


श्री. बाळासाहेब मुखेकर


श्रीमती विद्युल्लता आढाव


श्री. अनिल भवर


श्री. अविनाश निंभोरे


श्री. नानासाहेब बडाख


सौ. सिमा निकम


श्री. दिलीप औताडे


श्री. राजु मुंगसे


श्री. संतोष अकोलकर


श्रीमती मंजुषा नरवडे

## अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि. अहमदनगर

मुख्य कार्यालय : ऐक्य मंदिर, आनंदी बाजार, अहमदनगर

# वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

सन २०२२-२०२३ (फक्त सभासदांकरिता)

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड, अहमदनगर या बँकेची सन २०२२-२०२३ सालची १०४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २०/०८/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वा. **स्थळ : ''सुखकर्ता लॉन्स् '', कल्याण रोड, बायपास चौक, अहमदनगर** या ठिकाणी **बँकेचे चेअरमन मा.श्री. संदीप युवराज मोटे** यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी उपस्थित राहावे ही विनंती.

## वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषय

१. दिनांक १८/०९/२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. सन २०२२-२०२३ चा अहवाल ताळेबंद व नफा-तोटा पत्रक यावर विचार करणे व स्विकृत करणे.
३. सन २०२२-२०२३ सालचे वैधानिक लेखापरिक्षण अहवालावर विचार करणे व स्विकृत करणे.
४. सन २०२२-२०२३ सालचे नफा वाटणीस मान्यता देणे.
५. सन २०२३-२०२४ सालचे तयार केलेल्या अंदाज पत्रकाची व प्रगतीच्या तक्त्याची माहिती घेणे व स्विकृत करणे.
६. सन २०२३-२०२४ सालासाठी अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणुक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
७. सन २०२३-२०२४ सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकाचे नियुक्ती बाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.
८. मा. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.
९. मा. संचालक मंडळाने सुचविल्या प्रमाणे पोटनियम दुरूस्तीस मान्यता देणे.
१०. सभासद कर्ज निवारण व मदत निधी नियमावली दुरूस्तीस मान्यता देणे.
११. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या कामांचा कायदा व नियमानुसार विचार करणे.
१२. जामखेड शाखा कार्यालयासाठी स्वमालकीची सहाण जागा अथवा इमारत घेणे बाबत विचार करणे.
१३. श्रीरामपूर शाखेची वापरात नसलेली इमारत क्र. १ ची विक्री करणे बाबत विचार करणे.
१४. कायम ठेवीमधून प्राथमिक शिक्षक विकास मंडळाकडे रक्कम वर्ग करणे बाबत विचार करणे.
१५. आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची रजा मंजुर करणे.
१६. मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर विचार करणे.

(मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून)

अहमदनगर
दिनांक : ०५/०८/२०२३

**दि. वि. मुरदारे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**विशेष सुचना :-**

१) कोरम अभावी सभा अर्धा तास तहकुब करण्यात येईल व नंतर त्याच जागी तीच सभा चालू होईल. अशा सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही.
२) वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, लेखा परिक्षकाचा लेखा परिक्षण अहवाल बँकेच्या मुख्यालयात पहावयास मिळेल.
३) सभासदांना विषयानुरूप काही सुचना करावयाची असल्यास त्या www.shikshakbanknagar.com बँकेच्या कमेंट बॉक्समध्ये अथवा बँकेच्या मुख्य कार्यालय येथे लेखी स्वरुपात दि. १८/०८/२०२३ पर्यंत कराव्यात. त्यानंतर आलेल्या सुचनांचा विचार केला जाणार नाही.
४) सन २०२२-२०२३ चा वार्षिक अहवाल बँकेच्या www.shikshakbanknagar.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
५) सभासदास सभा उपस्थितीचे सर्टिफिकेट सभेच्यावेळी बँकेने नेमलेले अधिकृत अधिकारी त्यांचे सहीने देतील. असे सर्टिफिकेट उपस्थिती बाबत निर्णायक पुरावा असेल.
६) बँकेच्या सभासदांचा प्रशिक्षण वर्ग वार्षिक सभेच्या ठिकाणी सकाळी १० ते ११ यावेळेत घेण्यात येणार आहे.

# संचालक मंडळ

## (सन २०२२ ते २०२७)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मा.श्री. मोटे संदीप युवराज (एम.ए.एम.एड.नेट,सेट, पीएच.डी.(अॅपी) | चेअरमन | श्रीगोंदा |
| २ | मा.श्री. सारोक्ते कैलास इंद्रभान (बी.ए.बी.एड.) | व्हा. चेअरमन | अकोले |
| ३ | मा.श्री. राहिंज भाऊराव कारभारी (एम.ए.डी.एड.) | संचालक | संगमनेर |
| ४ | मा.श्री. भणभणे महेंद्र गोरखनाथ (बी.कॉम.डी.एड.) | संचालक | नगर |
| ५ | मा.श्री. काळे सुर्यकांत चंद्रकांत (बी.ए.डी.एड.) | संचालक | पारनेर |
| ६ | मा.श्री. जेजुरकर शशिकांत काशिनाथ (एम.ए.डी.एड.) | संचालक | कोपरगाव |
| ७ | मा.श्री. वाघमारे योगेश पोपट (बी.एस्.सी.बी.एड.) | संचालक | राहता |
| ८ | मा.श्री. सरोदे बाळासाहेब अभिमन्यु (बी.ए.बी.एड.) | संचालक | श्रीरामपूर |
| ९ | मा.श्री. राऊत संतोषकुमार किसनराव (बी.ए.डी.एड.) | संचालक | जामखेड |
| १० | मा.श्री. लवांडे कल्याण रावसाहेब (बी.ए.डी.एड.) | संचालक | पाथर्डी |
| ११ | मा.श्री. विटनोर गोरक्षनाथ जनार्दन (बी.ए.डी.एड.) | संचालक | राहुरी |
| १२ | मा.श्री. गोरे रमेश नामदेव (एम.ए.बी.एड.) | संचालक | शेवगाव |
| १३ | मा.श्री. आभाळे आण्णासाहेब रामभाऊ (बी.ए.बी.एड.) | संचालक | अकोले |
| १४ | मा.श्री. चोपडे रामेश्वर निवृत्ती (बी.ए.बी.एड.) | संचालक | नेवासा |
| १५ | मा.श्री. तापकिर बाळासाहेब बन्सी (बी.एस.सी.बी.एड.) | संचालक | कर्जत |
| १६ | मा.श्री. कदम माणिक बाबासाहेब (एच.एस.सी.डी.एड.) | संचालक | न.पा. कोपरगाव |
| १७ | मा.श्री. कराड शिवाजी भगवान (एम.ए.बी.एड.) | संचालक | नॉन टिचींग, नेवासा |
| १८ | मा.श्रीम. घुले सरस्वती पुरूषोत्तम (बी.ए.डी.एड.) | संचालिका | संगमनेर |
| १९ | मा.श्रीम. बांगर निर्गुणा रघुनाथ (बी.ए.डी.एड.) | संचालिका | नगर |
| २० | मा.श्री. बाबर कारभारी राजाराम (एम.ए.बी.एड.) | संचालक | पारनेर |
| २१ | मा.श्री. शिरसाट ज्ञानेश्वर विलासराव (एस.एस.सी.डी.एड.) | संचालक | पाथर्डी |
| २२ | मा.श्रीम. शेख मिनाज ताजमोहमद (बी.ए.डी.एड.) | स्विकृत संचालिका | श्रीरामपुर |
| २३ | मा.श्री. मुरदारे दिलीप विठ्ठलराव (एम.ए.जी.डी.सी.अॅण्ड ए.) | CEO कार्यलक्षी संचालक | |

**बँकर्स** : महाराष्ट्र राज्य सह. बँक, मुंबई, जिल्हा मध्य. सहकारी बँक, स्टेट बँक, अॅक्सिस बँक, येस बँक, सेंट्रल बँक, आयडीबीआय बँक, सुर्योदय स्मॉल फाय. बँक.

**कायदेशीर सल्लागार** : अॅड. मा. एम.एन. मोरे व अॅड. मा. राकेश एस. पाटील

**वैधानिक लेखापरिक्षक** : मे. मालाणी सोमाणी चांडक ऑण्ड असो.चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे.

**लोकल / कंकरंट ऑडीटर** : मे. अमित पोखरणा असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंट, अहमदनगर.

# १०४ वा वार्षिक अहवाल व ताळेबंद

## सन २०२२- २०२३

सन्माननिय सहकारी सभासद बंधु भगिनींनो,

सप्रेम नमस्कार...!

सन २०२२ मध्ये आपल्या सर्वांच्या सहकार्याने गुरुमाऊली मंडळ २०१५, ऐक्य मंडळ, शिक्षक भारती, एकल मंच प्रणित संचालक मंडळ बँकेत सत्तेवर आल्यानंतर सभासदांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरवीत वेळोवेळी केलेल्या मागणी प्रमाणे व सूचनेप्रमाणे विद्यमान संचालक मंडळ सभासदाभिमुख कारभार करत आहोत.

०३ नोव्हेंबर २०२२ रोजी माझी बँकेच्या चेअरमन पदी व माझे सहकारी श्री. कैलास इंद्रभान सारोक्ते यांची व्हा.चेअरमन पदी संचालक मंडळाने निवड केली. चेअरमन म्हणून मला संधी दिल्या बद्दल गुरूमाऊली मंडळ २०१५, ऐक्य मंडळ, शिक्षक भारती, एकल मंच व मंडळाचे नेते श्री. बापूसाहेब तांबे तसेच सर्व संचालक मंडळ यांना मी मनापासून धन्यवाद देतो. सर्वांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्याचा मी प्रयत्न करीत आहे, सर्वांनी साथ दिल्यामुळेच प्रत्येक जण त्या ठिकाणी चांगल्या प्रकारे काम करत आहे, आदर्श कारभाराची नोंद सर्व आर्थिक संस्थांनी घेतली आहे. आपल्या योजनांचे अनुकरण राज्यभरातील संस्था करत आहेत. आज सभासदांना ३८ लाखा पर्यंत कर्ज देत आहोत. एवढी पत आपल्या बँकेने निर्माण करत असतांनी ठेवीदारांनी बँकेवर मोठा विश्वास व्यक्त केला आहे.

मागील २५ वर्षाचा बँकेचा कारभार पाहिला असता गुरुमाऊली मंडळ सत्तेवर आल्यापासून झालेले निर्णय हे फक्त आणि फक्त सभासद हित डोळ्यासमोर ठेवून घेतलेले आहेत. या मध्ये आपल्या सर्वांचा अतिशय मोलाचा वाटा आणि भक्कम साथ लाभली आहे. जिल्हाभरातील कोणत्याही सभासदांनी एखादी चांगली योजना मांडली तर ती सुचना बँकेच्या कारभारात आणण्याचा आमचा प्रयत्न राहील, त्यामुळे आपल्या बँकेची आणखी चांगली पत व प्रतिष्ठा वाढेल या कडे आमचे लक्ष राहील.

१ वर्षात बँकेच्या ठेवीत रू ९१ कोटीने वाढ झालेली आहे. आपल्या बँकेने सभासद कर्ज मर्यादा ३५ लाखाहून ३८ लाख केली. कर्जाच्या व्याजाचा दर आर्थिक वर्षात २ वेळेस कमी करून तो आज घरकर्ज, वाहनतारण कर्ज, व शैक्षणिक कर्जास ८% आहे, तसेच जामीनकर्ज व इतर कर्जास ८.५०% इतका आहे. दि. १/४/२०२३ पासुन ठेवीचे व्याजदर वाढविले आहे. निवडणूक झाल्यानंतर कर्जाचा व्याजदर वाढविण्याची परंपरा मोडीत काढली आहे. कायम ठेव व्याज व कर्जाचा व्याजदर यात फक्त १.५०% चा फरक आहे.

वैद्यकिय मदत, अंत्यसेवा मदत, शुभमंगल भेट, कै दोंदे पारितोषिक, मा. कै. भा.दा.पाटील गुरुजी पारितोषिक, सभासद कल्याण निधी मधुन वाटप केले जाते. मयताचे संपूर्ण कर्ज माफ करून वारसांना रू. ५ लाख मदत व कुटूंब आधार निधी मधुन रू. १० लाख मदत दिलेली आहे. तसेच आपल्या बँकेत RTGS/NEFT, एटीएम कार्ड,एस.एम.एस. या योजना सुरू आहेत. ७ शाखांमध्ये अल्पदरात लॉकर सुविधा सुरू आहे. तसेच मोबाईल बँकिंग सुविधा देणेसाठी बँक प्रयत्नशील आहे.

आपल्या सहकार्याबद्दल मी आपला ऋणी आहे. सन २०२२-२०२३ सालाचा संचालक मंडळाने केलेला कार्यवृत्त अहवाल विषय पत्रिकेनुसार विषय आपणापुढे सादर करीत आहे. त्यास मंजुरी द्यावी ही विनंती.

● **सभासद –** दि. ३१/०३/२०२२ अखेर बँकेच्या भागधारक सभासदांची संख्या १०८३१ एवढी होती. अहवाल सालामध्ये १८४ सभासदांना नवीन सभासदत्व देण्यात आलेले असून ३३७ सभासदांनी सभासदत्वाचा राजीनामा दिलेला आहे. दि. ३१/०३/२०२३ अखेर सभासदांची संख्या १०६७८ एवढी आहे. तसेच नाममात्र सभासदांची संख्या ११९ आहे.

● **भाग भांडवल –** बँकेचे अधिकृत भाग भांडवल रू. ९० कोटी असून प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रू. १०००/– आहे. दि.३१/०३/२०२२ अखेर वसूल भाग भांडवल रू. ६८,६६,५६,७००/– एवढे होते. अहवाल सालात वरील भाग भांडवलामध्ये रू.५,३७,२९,२२५/– इतकी वाढ झालेली आहे. दि. ३१/०३/२०२३ अखेर बँकेचे वसूल भाग भांडवल रू. ७४,०३,८५,९२५/– इतके आहे.

● **रिझर्व्ह व इतर फंडस् –** बँकेकडे दि. ३१/३/२०२२ अखेर रू. २७,७५,५०,३४४.४९ इतके रिझर्व्ह व इतर फंड शिल्लक होते. अहवाल सालात गतवर्षाच्या नफा वाटणीतून व चालू सालात केलेल्या तरतुदीमुळे रू. १,०३,२०,५६९.९० इतकी वाढ होऊन दि. ३१/०३/२०२३ अखेर रू. २८,७८,७०,९१४.३९ इतका रिझर्व्ह व इतर फंड शिल्लक आहे.

● **सभासद कल्याण निधी –** दि. ३१/०३/२०२२ अखेर रू. १५,७२,२०३/– इतका सभासद कल्याण निधी शिल्लक होता. गतवर्षाचे नफा वाटणीमधून रू. ५०,००,०००/– व व्याजातून रू. ५,३३५/– जमा झाले. २६ मयत सभासदांचे वारसांना प्रत्येकी रू. ३,०००/–

प्रमाणे रू. ७८,०००/- अंत्यसेवा मदत दिलेली आहे. २८९ सभासदांच्या मुला - मुलींच्या लग्नात शुभमंगल रु. ११,०००/- प्रमाणे रु. ३१,७९,०००/-दिलेले आहेत. ५१ सभासदांना प्रत्येकी रू. २५,०००/-, ०१ सभासदास रु. २०,०००/-, ०२ सभासदास १०,०००/- व २२ सभासदांना प्रत्येकी रू. ५,०००/- प्रमाणे एकूण रु. १४,२५,०००/- वैद्यकिय मदत दिलेली आहे. कै. दादासाहेब दोंदे व कै. भा.दा. पाटील गुरुजी पारितोषिक रू. १,२३,२२०/- पेड केलेली आहे. असा रूपये ४८,०५,२२०/- निधी खर्ची पडून दि. ३१/०३/२०२३ अखेर रू. १७,७२,३१८/- इतका सभासद कल्याण निधी शिल्लक आहे.

● **सभासद कर्ज निवारण व मदत निधी** - दि. ३१/०३/२०२२ अखेर रूपये ३,०६,५०,९३८/- एवढी रक्कम या खाती शिल्लक होती. या आर्थिक वर्षात सदर ठेवीचे व्याजातुन रू. २,२५,६०,७९४/- जमा झाले. परतीचे १९९ सभासदांचे रू. ७,०००/- प्रमाणे, तसेच विनापरतीचे ४० सभासदाकडून रू. १०,०००/- प्रमाणे, व ५ सभासदांचे रू. ५,०००/- प्रमाणे असे एकूण रू. १८,१८,०००/- जमा झाले. तसेच थकबाकीदारांकडून मुद्दल रू. १०,४४,१२३/- व व्याज रू. ८६,१८१/- जमा झाले, येणे प्रमाणे एकूण रू. २,५५,०९,०९८/- जमा झाले.

अहवाल सालात २० मयत सभासदांचे रू. २,९०,८९,५६४/- कर्ज माफ केले व २८ मयत सभासदांचे वारसास रू. ५ लाख प्रमाणे रू. १,४०,००,०००/- आर्थिक मदत दिली. ३३६ डिसमेंबर सभासदांना परतीचे घेतलेले रू. ७०००/- प्रमाणे रू. २३,५२,०००/- दिले. या प्रमाणे एकुण रू. ४,५४,४१,५६४/- इतका निधी नावे होऊन दि. ३१/०३/२०२३ अखेर सदर निधी मध्ये रू.१,०७,१८,४७२/- एवढी रक्कम शिल्लक आहे.

दि. ३१/०३/२०२२ अखेर थकबाकीदारांकडून सदर निधीमध्ये रू. २२,८०,३४३/- येणे होते पैकी रू. १०,४४,१२३/- जमा होऊन दि. ३१/०३/२०२३ अखेर रू. १२,३६,२२०/- येणे आहे.

| अ.नं. | मयत सभासदाचे पूर्ण नाव | तालुका | कर्ज बार रक्कम | वारसादारास आर्थिक मदत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | बिलकीस इब्राहिम खान | पाथर्डी | - | ५,००,०००/- | ५,००,०००/- |
| २ | नंदा भाऊसाहेब फुलकर | संगमनेर | - | ५,००,०००/- | ५,००,०००/- |
| ३ | प्रशांत काशिनाथ वस्तारे | जामखेड | - | ५,००,०००/- | ५,००,०००/- |
| ४ | बाबा दशरथ गायकवाड | कोपरगाव | - | ५,००,०००/- | ५,००,०००/- |
| ५ | भाऊसाहेब किसन घोरपडे | कर्जत | - | ५,००,०००/- | ५,००,०००/- |
| ६ | शिवराम खंडू मुंढे | अकोले | - | ५,००,०००/- | ५,००,०००/- |
| ७ | सुनिल माधव सोंडकर | कर्जत | १८,९५,८८१/- | ५,००,०००/- | २३,९५,८८१/- |
| ८ | महादेव सोनबा नाईक | नगर | - | ५,००,०००/- | ५,००,०००/- |
| ९ | अंकुश रामभाऊ रोकडे | नगर | ४३,३७७/- | ५,००,०००/- | ५,४३,३७७/- |
| १० | रूपाली माणिक माळी | कर्जत | १७,५६,५२८/- | ५,००,०००/- | २२,५६,५२८/- |
| ११ | गुरूनाथ कुंडलिक लांघी | अकोले | ११,७६,३६३/- | ५,००,०००/- | १६,७६,३६३/- |
| १२ | जमिल इस्माईल काकर | श्रीरामपूर | १४,१८,९९६/- | ५,००,०००/- | १९,१८,९९६/- |
| १३ | अंकुश दत्तात्रय बेलोटे | श्रीगोंदा | २०,१७,९६१/- | ५,००,०००/- | २५,१७,९६१/- |
| १४ | लक्ष्मण वामन भगत | श्रीगोंदा | २०,८२,६८२/- | ५,००,०००/- | २५,८२,६८२/- |
| १५ | संतोष विठ्ठल गाडेकर | कोपरगाव | ६०,४०४/- | ५,००,०००/- | ५,६०,४०४/- |
| १६ | ज्ञानदेव रेवजी दाते | संगमनेर | ११,९९,५४६/- | ५,००,०००/- | १६,९९,५४६/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | संजय मारुती उदार | श्रीगोंदा | - | ५,००,०००/- | ५,००,०००/- |
| १८ | संतोष सिताराम लष्करे | नेवासा | २१,८४,७३१/- | ५,००,०००/- | २६,८४,७३१/- |
| १९ | विलास अमृता आरोटे | अकोले | १८,०२,६०६/- | ५,००,०००/- | २३,०२,६०६/- |
| २० | शशिकला कुंडलिक घाणे | अकोले | - | ५,००,०००/- | ५,००,०००/- |
| २१ | नामदेव चिंधू सुकटे | अकोले | १९,४३,४७१/- | ५,००,०००/- | २४,४३,४७१/- |
| २२ | वैजयंती रघुनाथ सोनवणे | श्रीरामपूर | १०,८२,२१९/- | ५,००,०००/- | १५,८२,२१९/- |
| २३ | अन्सारी फारुक समरीन इमाहउद्दीन | नेवासा | २३,३९,३३३/- | ५,००,०००/- | २८,३९,३३३/- |
| २४ | बबन नामदेव शिंगाडे | कोपरगाव | ३,६९,२३८/- | ५,००,०००/- | ८,६९,२३८/- |
| २५ | प्रेमनाथ लक्ष्मण डोंगरे | संगमनेर | १९,६४,४०७/- | ५,००,०००/- | २४,६४,४०७/- |
| २६ | रविंद्रकुमार बबनराव उदावंत | अकोले | - | ५,००,०००/- | ५,००,०००/- |
| २७ | कविता रावसाहेब हराळ | नगर | - | ५,००,०००/- | ५,००,०००/- |
| २८ | अशोक मारुती गजरमल | अकोले | - | ५,००,०००/- | ५,००,०००/- |
| २९ | संदीप दत्तात्रय शेटे | कर्जत | १८,००,४६६/- | - | १८,००,४६६/- |
| ३० | मनोज देवराम झडे | अकोले | १५,६०,०५६/- | - | १५,६०,०५६/- |
| ३१ | गंगाधर भिकाजी दिघे | कोपरगाव | ९२,९३०/- | - | ९२,९३०/- |
| ३२ | म्हातारदेव केरू दगडखैर | नेवासा | २२,९८,३६९/- | - | २२,९८,३६९/- |
| | एकूण | | २,९०,८९,५६४/- | १,४०,००,०००/- | ४,३०,८९,५६४/- |

● **कुटुंब आधार निधी –** दि. ३१/०३/२०२२ अखेर एकूण निधी रू. ९,१८,५००/– शिल्लक होता. अहवाल सालात दरमहा रु. ५००/– प्रमाणे निधी एकूण रुपये ६,९४,२४,०००/– इतका जमा झाला. पुढील मयताचे वारसांना रू. १० लाख प्रमाणे रू. ६,५०,००,०००/– मदत पेड केली दि. ३१/०३/२०२३ अखेर रू. ५३,४२,५००/– एवढी रक्कम कुटुंब आधार निधी खाती शिल्लक आहे.

## कुटुंब आधार निधीमधून प्रत्येकी रु. १० लाख दिलेली मदत ०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३

| अ.नं. | मयत सभासदाचे पूर्ण नाव | तालुका |
|---|---|---|
| १ | हसीना शमशुद्दीन तांबोळी | कर्जत |
| २ | गजानन सोनाजी काळोखे | श्रीगोंदा |
| ३ | भानुदास रघुनाथ खामकर | श्रीगोंदा |
| ४ | प्रविणकुमार प्रभाकर यादव | श्रीगोंदा |
| ५ | संदीप रघुनाथ शिंदे | नेवासा |
| ६ | वैशाली पांडुरंग कडवे | श्रीगोंदा |
| ७ | किशोर रामकृष्ण शिदोरे | नगर |
| ८ | रिहाना अब्दुलगनी शेख | श्रीरामपूर |

| अ.नं. | मयत सभासदाचे पूर्ण नाव | तालुका |
|---|---|---|
| ९ | लक्ष्मण हरिभाऊ गलांडे | श्रीगोंदा |
| १० | रमेश लालचंद कचे | नेवासा |
| ११ | खैरमोहंम्मद हुसेन खान | नगर |
| १२ | जकिया हारून पठाण | नगर |
| १३ | इस्माईल जाफरभाई शेख | कोपरगांव |
| १४ | बाळासाहेब लक्ष्मण देशमुख | पाथर्डी |
| १५ | भाऊ दादू तपासे | अकोले |
| १६ | काळू वाळू धनगर | अकोले |

## कुटुंब आधार निधीमधून प्रत्येकी रु. १० लाख दिलेली मदत ०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३

| अ.नं. | मयत सभासदाचे पूर्ण नाव | तालुका |
|---|---|---|
| १७ | प्रकाश दत्तात्रय मैड | अकोले |
| १८ | ज्योती नारायण आहेर | संगमनेर |
| १९ | बळीराम लक्ष्मण सरोदे | जामखेड |
| २० | अमित बाळासाहेब पात्रे | नेवासा |
| २१ | वंदना नामदेव रेपाळे | नगर |
| २२ | शंकर हरिकिसन उनबेग | शेवगाव |
| २३ | अनशाबापू शिवराम नरसाळे | संगमनेर |
| २४ | प्रताप बन्यासाहेब चव्हाण | पाथर्डी |
| २५ | नागनाथ हौसाजी कोनकेवाड | जामखेड |
| २६ | पुंजाहारी विठ्ठल काळे | संमगनेर |
| २७ | जुनेद अहमद पिरमोहम्मद शेख | संगमनेर |
| २८ | परमेश्वर मल्लिकार्जुन मोरे | श्रीगोंदा |
| २९ | धोंडू रामचंद्र खेताडे | अकोले |
| ३० | अमेना गजाला पिरमोहंम्मद शेख | संगमनेर |
| ३१ | चंद्रकांत लक्ष्मण गोरे | नेवासा |
| ३२ | अरूण सखाराम लोहकरे | अकोले |
| ३३ | शंकर जनार्दन बर्डे | शेवगाव |
| ३४ | राजेंद्र दशरथ कुमटकर | जामखेड |
| ३५ | शिलाताई वामन ऊफळे | शेवगाव |
| ३६ | संजय भगवान गायकवाड | पाथर्डी |
| ३७ | उज्वला पांडूरंग गुंजाळ | अकोले |
| ३८ | मिनानाथ निवृत्ती खाडे | अकोले |
| ३९ | अनिल झुंबर पारधी | पारनेर |
| ४० | कृष्णा गंगाराम गवारे | संगमनेर |
| ४१ | सोमनाथ तुकाराम भांगरे | अकोले |

| अ.नं. | मयत सभासदाचे पूर्ण नाव | तालुका |
|---|---|---|
| ४२ | युवराज यशवंत घनकुटे | अकोले |
| ४३ | संध्या बन्सी झरेकर | राहुरी |
| ४४ | शिवाजी विठ्ठल म्हैसमाळे | श्रीरामपूर |
| ४५ | गणेश रघुनाथ साळवे | श्रीरामपूर |
| ४६ | लक्ष्मण लहू आढळ | अकोले |
| ४७ | दादासाहेब बाजीराव कदम | श्रीरामपूर |
| ४८ | बिलकिस इब्राहिम खान | पाथर्डी |
| ४९ | नंदा भाऊसाहेब फुलकर | संगमनेर |
| ५० | प्रशांत काशिनाथ वस्तारे | जामखेड |
| ५१ | बाबा दशरथ गायकवाड | कोपरगांव |
| ५२ | अशोक मारूती गजरमल | अकोले |
| ५३ | भाऊसाहेब किसन घोरपडे | कर्जत |
| ५४ | शिवराम खंडू मुंढे | अकोले |
| ५५ | सुनिल माधव सोंडकर | कर्जत |
| ५६ | महादेव सोनबा नाईक | नगर |
| ५७ | अंकुश रामभाऊ रोकडे | नगर |
| ५८ | रूपाली माणिक माळी | कर्जत |
| ५९ | गुरूनाथ कुंडलिक लांघी | अकोले |
| ६० | जमिल इस्माईल काकर | श्रीरामपूर |
| ६१ | अंकुश दत्तात्रय बेलोटे | श्रीगोंदा |
| ६२ | लक्ष्मण वामन भगत | श्रीगोंदा |
| ६३ | संतोष विठ्ठल गाडेकर | कोपरगांव |
| ६४ | ज्ञानदेव रेवजी दाते | संगमनेर |
| ६५ | संजय मारुती उदार | श्रीगोंदा |

• **ठेवी –** ठेवी मिळविण्यासाठी बँका–बँकामध्ये मोठीच स्पर्धा असते अशा परिस्थितीतही अहवाल सालामध्ये मा.संचालक, सभासद व कर्मचारी यांनी कालबद्ध नियोजन करून, परिश्रम घेऊन ठेवी मोठ्या प्रमाणात मिळविल्या आहेत. दि. ३१/०३/२०२२ रोजी बँकेकडील एकूण ठेवी रू. १२०५,८३,०८,९२८.४३ एवढ्या होत्या. अहवाल सालामध्ये त्यात रूपये ९०,४१,८६,१९५.६९ इतकी वाढ झालेली आहे. दि. ३१/३/२०२३ अखेर बँकेच्या एकूण ठेवी रू. १२९६,२४,९५,१२४.१२ एवढ्या आहेत.

• **ठेवी विमा हप्ता (डी.आय.सी.जी.सी.) –** माहे मार्च २०२२ चे रकमेवर दि. १३/०५/२०२२ रोजी रू. ८७,२०,८००/– व माहे सप्टेंबर २०२२ चे रकमेवर दि. १७/११/२०२२ रोजी रू. ९४,२८,५००/– असा एकूण रू. १,८१,४९,३००/– ठेव विमा हप्ता या आर्थिक वर्षामध्ये भरणा केलेला आहे.

• **गुंतवणुक –** बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ चे कलम १८ व २४ मधील तरतुदीचे पालन करणे बँकांवर बंधनकारक असते. या तरतुदींचे पालन संपूर्ण वर्षामध्ये करण्यात आलेले आहे. अहवाल सालात रोख व बँकेतील शिल्लकेत रु. ९,२६,४५,९९३.१५ कर्ज रोख्या मध्ये रु. ७४,७५,२९,५००/– ने वाढ झाली मुदत ठेव रिफंडेबल मध्ये रु. ३६,४६,६३,०००/– ने घट झाली. रिझर्व्ह फंड गुंतवणुक खाती रु. २,५०,००,०००/– ने वाढ, शेअर्स खाती पुर्वीचीच गुंतवणूक आहे. दि. ३१/०३/२०२३ अखेर ताळेबंद तपशीला प्रमाणे रोख व बँकेतील शिल्लक रु. ७२,७३,९६,२७२.३७, मुदत ठेव रु. ४३,१०,९२,०००/–, सरकारी कर्ज रोखे खाती रु. ३२९,०१,४५,३२०/–, शेअर्स खाती रु. १,६१,६६,०००/– अशी एकूण रु. ४४६,४७,९९,५९२.३७ इतकी गुंतवणूक आहे.

• **जागा व इमारती –** अहमदनगर शहरातील मध्यवर्ती भागात बँकेची ''ऐक्यमंदिर'' ही मुख्य कार्यालयाची भव्य वास्तू आहे. त्याचप्रमाणे श्रीरामपूर, पाथर्डी, नेवासा, कोपरगांव, राहुरी, शेवगांव, कर्जत व संगमनेर येथेही बँकेच्या स्वमालकीच्या इमारती आहेत. दि. ३१/०३/२०२२ अखेर जागा व इमारतीची एकूण किंमत रू. १,०४,२१,४९९.५० एवढी होती. बँकेच्या मालकीच्या सर्व इमारतीवरील झीज रू. ८,६८,२६८/– वजा जाता दि. ३१/०३/२०२३ अखेर जागा व इमारतीची एकूण किंमत रू. ९५,५३,२३१.५० इतकी आहे.

• **दिलेली कर्जे –** जामीन कर्ज रु. २७ लाख, घरकर्ज रु. ३० लाख, शैक्षणिक कर्ज रु. २५ लाख, वाहन तारण कर्ज रु. १२ लाख, वैद्यकिय कर्ज रु. ५ लाख, निकड कर्ज रु. १ लाख, प्रासंगिक कर्ज रु. ५० हजार. सभासदाची एकूण कमाल कर्ज मर्यादा रु. ३८ लाख. प्रॉपर्टी मॉर्गेज करुन दिल्यास शैक्षणिक कर्ज रु. २५ लाख, दि. ०१/१२/२०२२ पासून कर्जावरील व्याजदर ८.५०% व वाहन तारण कर्ज, घरकर्ज, शैक्षणिक कर्ज व्याजदर ८.००%. आहे. दि. ३१/०३/२०२२ रोजी रू. ९३७,४५,५१,६७१/– एवढे कर्ज येणे बाकी होते. त्यात रू. ४७,६७,१७,७२९/– इतकी वाढ होऊन दि. ३१/०३/२०२३ अखेर रु. ९८५,१२,६९,४००/– एवढी कर्ज बाकी येणे आहे.

• **थकबाकी –** दि. ३१/०३/२०२३ अखेर एकुण १४ थकबाकीदार असून त्यांचेकडे रू. १,८८,४८,०२३/– इतकी कर्ज येणे बाकी आहे. त्यांचे एकूण येणे कर्जाशी शेकडा प्रमाण ०.१९% आहे. नेट एन.पी.ए. ०.१०% आहे.

| अ.नं. | थकीत कर्जाची मुदत | थकबाकीदार संख्या | येणे कर्ज रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | एक वर्षाचे आतील | ११ | १,५५,२५,१२१/- |
| २ | १ ते २ वर्षापर्यंत | ३ | ३३,२२,९०२/- |
| | **एकूण** | १४ | **१,८८,४८,०२३/-** |

## थकबाकीदारांची नांवे व त्यांचेकडील येणे कर्जबाकी पुढीलप्रमाणे (३१/०३/२०२३ अखेर)

| अ.नं. | थकबाकीदाराचे नांव | तालुका | कर्ज रक्कम | अ.नं. | थकबाकीदाराचे नांव | तालुका | कर्ज रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ढगे भाऊसाहेब यशवंत | अकोले | १५,००,८७८/- | ९ | पवार सर्जेराव हरिचंद्र | कोपरगांव | ५५,४८७/- |
| २ | सोनवणे सुभाष कोंडाजी | अकोले | ३,४९,२२५/- | १० | गाढे दत्तु नामदेव | नेवासा | १८,१९,६३७/- |
| ३ | गोंधळे ज्योती अशोक | संगमनेर | १२,०५,९७३/- | ११ | शिंदे फक्कड नारायण | नेवासा | ६,५३,२२६/- |
| ४ | नरवडे रेवननाथ काशिनाथ | राहुरी | १५,८०,५०७/- | १२ | पवार सुनिल पन्नालाल | नेवासा | ८,९९,०८४/- |
| ५ | कदम प्रताप रमेश | श्रीरामपूर | २६,८५,२९१/- | १३ | सरोदे संभाजी कोंडिबा | नेवासा | १७,७०,५९२/- |
| ६ | कदम प्रताप रमेश | श्रीरामपूर | ४८,१०९/- | १४ | मोरे बाळासाहेब दगडू | कर्जत | २०,१८,९३७/- |
| ७ | कांबळे निवृत्ती तानाजी | कोपरगांव | १६,४७,०४४/- | | | | |
| ८ | पवार सर्जेराव हरिचंद्र | कोपरगांव | २६,१४,०३३/- | | एकुण | | **१,८८,४८,०२३/-** |

- **संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे –**

संचालक मंडळाचे नातेवाईक हे बँकेचे सभासदच आहेत, बाहेरील व्यक्ती नाही. संचालक व त्यांचे नातेवाईक यांना इतर सभासदांप्रमाणेच बँकेच्या पोटनियम व कर्जविषयक नियमावलीनुसार कर्ज दिलेले आहे.
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५ (२)१ अन्वये दि. ३१/३/२०२३ अखेरील माहीती.

| कर्जदार संचालक व त्यांचे नातेवाईकांची संख्या | वर्षाच्या सुरुवातीस येणे रक्कम | सहकारी वर्षात कर्जाऊ दिलेली रक्कम | सहकारी वर्षात परतफेड केलेली रक्कम | सहकारी वर्षाअखेर येणे रक्कम | येणे रक्कमेपैकी थकीत रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| संचालक – १९ | २,९४,६९,९४३/- | ६,२०,०९,०३७/- | ५,८३,७२,५३०/- | ३,३१,०६,४५०/- | नाही |
| नातेवाईक – ४ | ८२,५२,१६८/- | ८७,०३,६१६/- | ६५,९९,०९७/- | १,०३,५६,६८७/- | नाही |
| **एकूण – २३** | **३,७७,२२,१११/-** | **७,०७,१२,६५३/-** | **६,४९,७१,६२७/-** | **४,३४,६३,१३७/-** | **नाही** |

- **मिळालेले व दिलेले व्याज –** अहवाल सालात सर्वप्रकारच्या कर्जावर मिळालेले व्याज रू. ८०,८३,०३,९२३/- व गुंतवणुकीवर मिळालेले व्याज रू. २६,३७,७८,४०२.६३ मिळून एकूण रू. १०७,२०,८२,३२५.६३ एवढे व्याज मिळाले आहे. तसेच सर्वप्रकारच्या ठेवींवर एकुण रू. ७९,१९,६२,४९४.३२ इतके व्याज दिले आहे. कायम ठेवीवर ६.५०% प्रमाणे रू.१२,४९,५७,७४९/- व्याज सभासदांचे सेव्हिंग्ज ठेव खात्यावर दि. ३१/०३/२०२३ रोजी जमा करून अदा केलेले आहे.

- **वर्गणी व देणगी –** अहवाल सालात महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशन, मुंबई वार्षिक वर्गणी रू. ४७,२००/-, अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन अहमदनगर वार्षिक वर्गणी रू. ३५,४००/-, महाराष्ट्र एम्प्लॉईज बँक असोसिएशन मुंबई वार्षिक वर्गणी रू.१०,०००/-, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे वर्गणी रु. २,०००/-, अविज पब्लिकेशन मासिक वर्गणी रु. ७५०/- महाराष्ट्र राज्य सह बँक्स असो. मुंबई वार्षिक वर्गणी व प्रवेश फी रू. ३१,८६०/- या प्रमाणे एकूण रू. १,२७,२१०/- वर्गणी दिलेली आहे.

- **संचालक मंडळ सभा –** अहवाल सालात १२ मासिक सभा ४ विशेष सभा व जरूरी प्रमाणे उपसमित्यांच्या सभा झालेल्या असून दि.१८/०९/२०२२ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा झालेली आहे.

- **ऑडीट व इन्स्पेक्शन –**
अ) सन २०२२-२०२३ सालचे वैधानिक लेखापरिक्षण मे. मालाणी सोमाणी चांडक ॲण्ड असोसिएटस् चार्टर्ड अकौटंट पुणे. यांचे मार्फत झालेले असून बँकेस ऑडीट वर्ग **'अ'** मिळालेला आहे.
ब) सन २०२२-२०२३ सालाकरीता बँकेने कंकरंट/लोकल ऑडीटर म्हणून मे. अमित पोखरणा ॲण्ड असोसिएटस् चार्टर्ड अकौटंट, अहमदनगर यांची नेमणुक केलेली होती. त्यांनी मुदतीत ऑडीट केलेले असून बँकेस वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे.
क) बँकेचे VAPT आणि IS ऑडीट सेक माय आय टी फर्म, पुणे यांनी केलेले आहे.
ड) सन २०२२ अखेरचे रिझर्व्ह बँकेचे इन्स्पेक्शन झालेले आहे.

- **अंदाजपत्रका पेक्षा जादा खर्चाबाबत –**
मंजूर केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा ठेवीवर देलेले व्याज व इतर खर्च या मध्ये जादा खर्च झालेला आहे. त्यास मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

- **प्रशिक्षण –**
अहवाल सालात बँकेचे संचालक, सभासद व कर्मचारी यांनी वेळोवेळी प्रशिक्षण घेतलेले आहे.

- ठेवीदार शिक्षण व जागरूकता निधी **( DEAF)**
१० वर्षे व्यवहार न झालेले खात्याची रक्कम रिझर्व बँककडे Depositor Education & Awareness Fund खाती नियमानुसार पाठविले जाते सदर खात्याची माहिती शाखा कार्यालय व बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध केलेली आहे.

- **नफा वाटणी –** सन २०२२ – २०२३ मध्ये सर्व वैधानिक तरतुदी केल्यानंतर बँकेस रू. ९,८२,८९,४३५.६१ इतका निव्वळ नफा झालेला आहे. सदर नफ्याची वाटणी खालील प्रमाणे सुचविलेली आहे. त्यास मंजुरी मिळावी अशी मा. संचालक मंडळ शिफारस करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | राखीव निधी (२५% प्रमाणे) | २,४५,७२,३५९.०० |
| २ | सभासदांना लाभांश (९% प्रमाणे) | ६,२९,५५,०००.०० |
| ३ | सभासद कल्याण निधी | ५०,००,०००.०० |
| ४ | कर्मचारी कल्याण निधी | ३,००,०००.०० |
| ५ | निवडणूक फंड | ७,००,०००.०० |
| ६ | गुंतवणूक समकरण निधी (IFR) | १०,००,०००.०० |
| ७ | डेव्हलपमेंट फंड | ३०,००,०००.०० |
| ८ | इमारत निधी (सह. खातेचे मान्यतेने) दि. ३१/०३/२०१६ | ५,३५,०००.०० |
| ९ | रिझर्व्ह फंड स्ट्राँगरूम (सह.खातेचे मान्यतेने) दि. ३१/०३/२०१६ | १,८२,०००.०० |
| १० | लाभांश समकरण निधी | ४५,०७६.६१ |
| | **एकूण** | **९,८२,८९,४३५.६१** |

• **आभार –** बँकेचे सन २०२२–२०२३ सालचे कामकाज करताना बँकेच्या सर्व भागधारक सभासद बंधू भगिनी, ठेवीदार, हितचिंतक या सर्वांनी मला बहुमोल सहकार्य केलेले आहे. दि. ०३/११/२०२२ पासून चेअरमन म्हणून कामकाज करताना बँकेच्या माझ्या सर्व सहकारी संचालक बंधू – भगिनींनी मनापासून सहकार्य करून मला मोलाची साथ दिली आहे. त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो. तसेच बँकेचा अधिकारी वर्ग, सर्व कर्मचारी वर्ग यांनीही संचालक मंडळास कामकाज करताना सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांनाही धन्यवाद देतो.

बँकेचे कामकाज करताना सहकार खात्याचे अधिकारी वर्ग, शासकीय ऑडीटर, कंकरंट ऑडीटर यांनी वेळोवेळी बहुमोल सुचना व मार्गदर्शन केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. बँकेच्या आर्थिक व्यवहारासाठी बँकर्स, बँकांचे सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाने जे सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो. बँकेचे वसुलीकामी मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. अ.नगर, शिक्षणाधिकारी जि.प. अहमदनगर व त्यांचा स्टाफ, सर्व गटविकास अधिकारी, सर्व गटशिक्षणाधिकारी, सर्व केंद्र प्रमुख, सर्व मुख्याध्यापक, म.न.पा., न.पा. व भिंगार कॅन्टोन्मेंटचे प्रशासनाधिकारी यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो. कायदेशीरबाबी संबंधी बँकेस वेळोवेळी योग्य सल्ला दिल्याबद्दल बँकेचे कायदेशीर सल्लागार तसेच सीबीएस प्रणालीचे अधिकारी व कर्मचारी यांचेही मी आभार मानतो.

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ व त्यांची सर्व कार्यकारिणी अध्यक्ष उच्चाधिकार समिती व त्यांची सर्व कार्यकारिणी, जिल्हा गुरूमाऊली मंडळाचे अध्यक्ष व त्यांची सर्व कार्यकारिणी, तालुका गुरूमाऊली मंडळाचे अध्यक्ष व त्यांची सर्व कार्यकारिणी, तालुका संघाचे अध्यक्ष व त्यांची सर्व कार्यकारिणी, विकास मंडळ अहमदनगरचे विश्वस्त, महिला आघाडी अध्यक्ष व त्यांची सर्व कार्यकारिणी, ऐक्य मंडळ, शिक्षक भारती व एकल शिक्षक मंचचे सर्व नेते, अध्यक्ष अपंग संघटना व त्यांची कार्यकारिणी, सर्व पदाधिकारी व सदस्य या सर्वांचे मनापासून सहकार्य लाभत आहे या सारख्या अनेक दृष्य व अदृष्य हातांच्या पाठबळानेच या संस्थेचे आर्थिक हित जोपासण्यास आम्हांला बळ मिळत आहे.

सहकार चळवळीला अभिप्रेत असलेले कामकाज करून सर्व सभासदांच्या सामूहिक हिताचे संर्वधन होईल अशा प्रकारचे कार्य करण्याची संधी मला मिळाली याचे मला मन:स्वी समाधान वाटते. आपणा सर्वांच्या सहकार्याने बँकेला नेत्रदिपक यश प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करून भविष्यकाळातही बँकेच्या उज्वल प्रगतीस आपणां सर्वांची प्रेरणा व सामर्थ्य मिळो तसेच बँकेची दैदिप्यमान प्रगती होवो, अशी कामना प्रगट करून मा. संचालक मंडळाच्या वतीने १०४ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा तोटा पत्रक इ. आपल्या मंजुरीसाठी सादर करीत आहे.

जय सहकार....! जय गुरूमाऊली....!

आपला नम्र
**श्री.संदीप युवराज मोटे**
चेअरमन,
अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., अहमदनगर

अहमदनगर
दिनांक : ०५/०८/२०२३

## भावपूर्ण श्रद्धांजली..!

अहवाल सालात अनेक देशभक्त, स्वातंत्र्य सेनानी, थोर नेते,
लेखक, संशोधक, कवी, साहित्यिक, कलावंत, शास्त्रज्ञ, सैनिक, तंत्रज्ञ,
तज्ञ, खेळाडू, सामाजिक व सहकारी क्षेत्रातील कार्यकर्ते, बँकेचे सभासद, ठेवीदार, कर्मचारी,
हितचिंतक दिवंगत झाले त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.

**ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती
व सद्‌गती देवो ही ईश्वर चरणी प्रार्थना..**

## दि. ५ सप्टेंबर २०२२ रोजी खालील शिक्षकांना अहमदनगर जिल्हा परिषदेचा 'जिल्हा शिक्षक पुरस्कार' मिळालेला आहे त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन !

| अ. क्र. | शिक्षक/शिक्षिका यांचे नांव | हुद्दा | शाळेचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|
| १. | श्री. बाळासाहेब दत्तात्रय दळवी | केंद्रप्रमुख | जि.प.शाळा. चास, ता. नगर |
| २. | श्री. भाऊसाहेब हरी गायकवाड | केंद्रप्रमुख | जि.प.शाळा. वांबोरी ता. राहुरी |
| ३. | श्री. संतोष लक्ष्मण सदगीर | उपाध्यापक | जि.प.शाळा. आंबड ता. अकोले |
| ४. | श्री. अशोक विश्वनाथ शेटे | उपाध्यापक | जि.प.शाळा. खांडगाव, ता. संगमनेर |
| ५. | श्री. सुदाम नारायण साळुंके | उपाध्यापक | जि.प.शाळा. गिरमेवस्ती, ता. कोपरगांव |
| ६. | श्री. भिमराज पोपट शेळके | उपाध्यापक | जि.प.शाळा. पिंपरी लोकाई, ता. राहाता |
| ७. | श्रीम.तरन्नुम अब्बास खान | उपाध्यापक | जि.प.शाळा. बेलापूर उर्दु ता. श्रीरामपूर |
| ८. | श्रीम. विद्याताई बबनराव उदावंत | उपाध्यापक | जि.प.शाळा. दिघेवस्ती धानोरे, ता. राहुरी |
| ९. | श्रीम. सुमन भानुदास तिजोरे | उपाध्यापक | जि.प.शाळा. वडाळा बहिरोबा, ता. नेवासा |
| १०. | श्रीम. सविता सर्जेराव बुधवंत | उपाध्यापक | जि.प.शाळा. गुंफा, ता. शेवगाव |
| ११. | श्री. आप्पासाहेब रामभाऊ साळुंके | उपाध्यापक | जि.प.शाळा. जिरेवाडी, ता. पाथर्डी |
| १२. | श्रीम. अनिता विठ्ठल पवार | उपाध्यापक | जि.प.शाळा. लटकेवस्ती, ता. जामखेड |
| १३. | श्री. नवनाथ रामचंद्र दिवटे | उपाध्यापक | जि.प.शाळा. माळवदेवस्ती, ता. कर्जत |
| १४. | श्रीम. भावना कैलासनाथ मोहिते | उपाध्यापक | जि.प.शाळा. इंरिगेशन कॉलनी, मढेवडगाव, ता.श्रीगोंदा |
| १५. | श्रीम. ज्योती दत्तात्रय साबळे | उपाध्यापक | जि.प.शाळा. पवारवाडी, सुपा, ता. पारनेर |
| १६. | श्री. शरद गंगाधर धलपे | उपाध्यापक | जि.प.शाळा. काळामळा, ता. नगर |

# सभासद / खातेदारांना
# विनम्र आवाहन...!

- आपल्या खात्यावर डी.ए.१ फार्म नुसार वारस नोंदणी करुन घ्यावी.
- आपले खाते नियमित ऑपरेट करावे, अन्यथा सदर खातेची रक्कम १० वर्षेनंतर रिझर्व्ह बँकेकडे पाठवावी लागते. पाठविलेले खात्याची यादी बँकेचे शाखेत व वेबसाईडवर प्रसिद्ध केली आहे.
- नॉन ऑपरेटीव्ह खाते २ वर्षापेक्षा जास्त ठेवू नये. अन्यथा व्यवहारावर निर्बंध येऊ शकतात.
- खात्यावर आवश्यक तो बॅलन्स ठेवावा अन्यथा पेनल्टी चार्जेस पडेल.
- खात्याची के.वाय.सी. ३ वर्षातून एकदा अपडेट करुन घ्यावी. अन्यथा व्यवहारावर निर्बंध येऊ शकतात.
- आपला पत्ता/फोन नंबर/मेल आयडी बदलल्यास त्वरीत बँकेत बदलून द्यावा/दिलेला नसल्यास तो द्यावा.
- बँकेच्या खातेदारासाठी विम्याची सोय करण्यात आलेली आहे त्यात सहभागी व्हावे.
- चेकबुक/एटीएम कार्डचा वापर करावा.
- लॉकर सुविधांचा अत्यल्प दरात लाभ घ्यावा, ज्यांनी लॉकर सुविधा घेतलेली आहे. त्यांनी नियामानुसार किमान वर्षातून एकदा लॉकर ऑपरेट करणे आवश्यक आहे.
- SI पध्दतीने कर्जाचा हप्ता दरमहा एक तारखेस भरण्याची सोय आहे, त्या करिता सेव्हींग्ज ठेव रिकव्हरी खाते उघडावे.

प्रत्यक्ष बँकेच्या सेवेचा लाभ घेवून, सहकार्य असावे.

## शाखांसह एकत्रित ताळेबंद

| ३१/०३/२०२२ रुपये पैसे | भांडवल व देणी | ३१/०३/२०२३ रुपये पैसे | ३१/०३/२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **९०,००,००,०००.००** | **अधिकृत भागभांडवल** | **९०,००,००,०००.००** | **९०,००,००,०००.००** |
| **६८,६६,५६,७००.००** | **वसूल भागभांडवल** | ७४,०३,८५,९२५.०० | **७४,०३,८५,९२५.००** |
| **२७,७५,५०,३४४.४९** | **रिझर्व्ह व इतर फंडस्** | | **२८,७८,७०,९१४.३९** |
| १६,५९,७०,५३७.०० | रिझर्व्ह फंड | १९,०७,७६,३६१.०० | |
| १,७४,८१,१३४.३० | इमारत फंड | १,८०,८८,८६१.३० | |
| ५,८०,३१८.७५ | डिव्हिडंड पुर्तता फंड | ५,९०,३७८.६५ | |
| ८७,००,०००.०० | संशयीत व बुडित कर्ज निधी | ८७,००,०००.०० | |
| ३,७६,००,०००.०० | उत्पन्नक्षम जिंदगी अतिरिक्त निधि | ३,९४,००,०००.०० | |
| ४,४३,५८५.४४ | गुंतवणूक घसारा निधी (I.D.R.) | ४,४३,५८५.४४ | |
| ४५,००,०००.०० | गुंतवणूक समकरण निधी (I.F.R.) | ५०,००,०००.०० | |
| १५,७२,२०३.०० | सभासद कल्याण निधी | १७,७२,३१८.०० | |
| १२,०४,१७०.०० | कर्मचारी कल्याण निधी | १२,७१,२४९.०० | |
| ३,०६,५०,९३८.०० | सभासद कर्ज निवारण व मदत निधी | १,०७,१८,४७२.०० | |
| १,७८,००४.०० | बँक शताब्दी निधी | ०.०० | |
| ७,९४,०००.०० | धर्मदाय निधी | ९,९४,०००.०० | |
| ६,५२,३५१.०० | प्रशिक्षण निधी | १,६३,५५९.०० | |
| २५,५०,९४५.०० | निवडणूक निधी | ५,००,०००.०० | |
| ७,५३,६५८.०० | थकबाकी व्याज राखीव निधी (OIR) | ६,०९,६३०.०० | |
| ९,१८,५००.०० | कुटुंब आधार निधी | ५३,४२,५००.०० | |
| ३०,००,०००.०० | आय टी डेव्हलपमेंट फंड | ३५,००,०००.०० | |
| **१२०५,८३,०८,९२८.४३** | **ठेवी** | | **१२९६,२४,९५,१२४.१२** |
| १९२,३३,२३,११८.०० | कायम ठेव (सभासद वर्गणी) | १९९,७०,८५,६७७.०० | |
| ३१,४४,७२,४७१.०० | सभासद कर्ज निवारण व मदत ठेव | ३९,७५,२७,५२५.०० | |
| ७८५,९३,०९,३३६.०० | मुदत ठेव | ८५८,४०,१९,३३१.०० | |
| २९,९९,८६,१५६.०० | दामदुप्पट ठेव | २९,८२,०४,७९१.०० | |
| ८,४२,७५,२४२.०० | दिडपट ठेव | ८,६३,५१,३६५.०० | |
| १३७,०६,५०,२८१.५४ | सेव्हिंग्ज ठेव | १३७,७३,८१,८६९.९३ | |
| १५,०५,५३,२२२.०० | रिकरींग ठेव | १६,५८,८३,२८६.०० | |
| ३,७१,५६,१५७.०० | अमर पेन्शन ठेव | ३,६२,७२,३१४.०० | |
| १,४१,१००.०० | दैनिक बचत ठेव | ०.०० | |
| १,८४,४१,८४४.८९ | चालू ठेव | १,९७,६८,९६५.१९ | |
| **२३,७१,३१,७७९.००** | **देणे व्याज** | | **२७,८०,७२,०४६.००** |
| २३,५०,४९,९१८.०० | मुदत ठेव देणे व्याज | २७,५७,७०,९६४.०० | |
| १,८४९.०० | दैनिक बचत ठेव देणे व्याज | ०.०० | |
| २०,४८,९२२.०० | मुदत संपलेल्या ठेवीचे देणे व्याज | २२,८०,८६६.०० | |
| ३१,०९०.०० | मुदत ठेव देणे व्याज (नॉन. एसआय) | २०,२१६.०० | |
| **१३२५,९६,४७,७५१.९२** | **एकूण बेरीज पुढील पानावर** | **१४२६,८८,२४,००९.५१** | **१४२६,८८,२४,००९.५१** |

## दि. ३१ मार्च २०२३ रोजीचा

| ३१/०३/२०२२ रुपये पैसे | जिंदगी व येणी | ३१/०३/२०२३ रुपये पैसे | ३१/०३/२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **६३,४७,५०,२७९.२२** | **रोख व बँकेतील शिल्लक** | | **७२,७३,९६,२७२.३७** |
| ६,८२,०४,५१८.०० | रोख शिल्लक | ५,९६,०१,३७९.०० | |
| १०,३०,८९,६९८.६१ | चालू ठेव - राज्य. सह.बँक मुंबई | ४,१०,४७,८९८.२९ | |
| ११,७१,४०,७६९.३० | चालू ठेव - जिल्हा मध्य. सह. बँक | १८,१२,८८,५१९.१० | |
| ४,३५,००,०३७.२८ | चालू ठेव - स्टेट बँक | ४,७४,०९,७७८.२८ | |
| ४,६६,७५,६७४.४१ | चालू ठेव - सेंट्रल बँक | १७,४७,७९,१२२.९१ | |
| १६,२४,४१२.५५ | चालू ठेव - ॲक्सिस बँक | ३८,०४,५५९.१० | |
| १,५८,८२,६१५.५४ | चालू ठेव - ॲक्सिस बँक (एटीएम) | १,३१,४१,९७५.७२ | |
| २,५०,७७,८२४.५२ | चालू ठेव - येस बँक (कलेक्शन) | ८,७३,७७०.२३ | |
| १,२८,८३,५७९.५४ | चालू ठेव - येस बँक (पेमेंट) | १,९४,०८,४९०.०७ | |
| १,००,५२,४३३.७० | चालू ठेव - स्टेट बँक (क्लिअरिंग) | ८९,२८,७७४.७० | |
| ९२,३०,१८९.७७ | चालू ठेव - येस बँक (CTS) | १,३८,३३,५२५.६७ | |
| १८,१३,७८,५२६.०० | चालू ठेव - IDBI बँक | १६,३२,६८,४७९.३० | |
| १०,०००.०० | चालू ठेव - येस बँक (BBPS) | १०,०००.०० | |
| | **गुंतवणूकी** | | |
| **७७,०७,५५,०००.००** | **अ) मुदत ठेवी -** | | **४३,१०,९२,०००.००** |
| १६,६५,००,०००.०० | रिझर्व्ह फंड-जिल्हा मध्य. सह. बँक | १९,१५,००,०००.०० | |
| ९,००,००,०००.०० | मुदत ठेवी - जिल्हा मध्य. सह. बँक | ०.०० | |
| १०,०००.०० | लॉकर डिपॉझिट - सेंट्रल बँक | १०,०००.०० | |
| २,५५,०००.०० | कर्मचारी रोखतारण-जिल्हा मध्य. सह. बँक | २,५२,०००.०० | |
| ६,१६,००,०००.०० | मुदत ठेवी - IDBI बँक, अ.नगर | ०.०० | |
| ३०,७९,००,०००.०० | मुदत ठेवी - सेंट्रल बँक, अ.नगर | १५,७९,००,०००.०० | |
| १४,४४,९०,०००.०० | मुदत ठेवी - ॲक्सिस बँक | ७,६४,३०,०००.०० | |
| ०.०० | मुदत ठेवी - सुर्योदय स्मॉल फाय. बँक | ५०,००,०००.०० | |
| **२५४,२६,१५,८२०.००** | **ब) गव्हर्मेंट सिक्युरिटी गुंतवणूक** | | **३२९,०१,४५,३२०.००** |
| १६०,०४,९२,०००.०० | केंद्र सरकार | २१९,६९,१४,०००.०० | |
| ९४,२१,२३,८२०.०० | राज्य सरकार | १०९,३२,३१,३२०.०० | |
| **१,६१,६६,०००.००** | **क) शेअर्स** | | **१,६१,६६,०००.००** |
| ८०,९१,०००.०० | राज्य सह. बँक मुंबई | ८०,९१,०००.०० | |
| ८०,७५,०००.०० | जिल्हा मध्य. सह. बँक | ८०,७५,०००.०० | |
| **३९६,४२,८७,०९९.२२** | **एकूण बेरीज पुढील पानावर** | **४४६,४७,९९,५९२.३७** | **४४६,४७,९९,५९२.३७** |

## शाखांसह एकत्रित ताळेबंद

| ३१/०३/२०२२ रुपये पैसे | भांडवल व देणी | ३१/०३/२०२३ रुपये पैसे | ३१/०३/२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १३२५,९६,४७,७५१.९२ | मागील पानावरुन बेरीज घेतली | १४२६,८८,२४,००९.५१ | १४२६,८८,२४,००९.५१ |
| ७,९२,५३,०४१.५५ | इतर देणी | | ५,३६,९८,२६०.०७ |
| ९७,०२२.५५ | अनामत देणे | ६,२१,७५४.०७ | |
| १७,३००.०० | नाममात्र सभासद फी देणे | १९,९००.०० | |
| २,५५,०००.०० | कर्मचारी रोख तारण देणे | २,५२,०००.०० | |
| ३१,६२,६६३.०० | कर्मचारी वेतन, प्रॉव्हिडंड फंड देणे | ३२,२५,०२९.०० | |
| २०,४५,६९१.०० | शासकिय ऑडिट फी देणे | २१,२९,६४२.०० | |
| १०,०००.०० | बयाणा रक्कम देणे | १,००,०००.०० | |
| ५,४०,००,०००.०० | आयकर देणे | ३,८३,००,०००.०० | |
| ३७,६७२.०० | फोन बील देणे | ०.०० | |
| ५७,४९०.०० | लाईट बील देणे | ०.०० | |
| ३०,९५६.०० | सिक्युरिटी डिपॉझिट देणे | ३०,९५६.०० | |
| १९,२००.०० | कर्मचारी व्यवसायकर देणे | १८,८००.०० | |
| ७,८७,११३.०० | टी.डी.एस. देणे | ६,९३,१८६.०० | |
| १,२९,७३४.०० | जी.एस.टी. देणे | १,२८,१६२.०० | |
| १,०३,२००.०० | प्रोसेस फी | १,५१,२५०.०० | |
| १,८५,००,०००.०० | कर्मचारी ग्रॅच्युईटी प्रिमियम देणे | ७९,१०,९१०.०० | |
| ०.०० | कर्मचारी एल.आय.सी. प्रिमियम देणे | १,१६,६७१.०० | |
| २,५७,५०,०००.०० | २०१९-२० चा शिल्लक नफा | २,५७,५०,०००.०० | २,५७,५०,०००.०० |
| ९,७६,५६,०७९.९० | चालू नफा | ९,८२,८९,४३५.६१ | ९,८२,८९,४३५.६१ |
| १३४६,२३,०६,८७३.३७ | एकुण | १४४४,६५,६१,७०५.१९ | १४४४,६५,६१,७०५.१९ |
| ४७,०९,७०८.०० | DEAF (कॉन्टिजंट लायबिलीटी) | ४८,५२,०२७.०० | |

संचालक मंडळ

श्री. भाऊराव कारभारी राहिंज
श्री. योगेश पोपट वाघमारे
श्री. गोरक्षनाथ जनार्दन विटनोर
श्री. बाळासाहेब बन्सी तापकिर
श्रीम. निर्गुणा रघुनाथ बांगर
श्री. महेंद्र गोरखनाथ भणभणे
श्री. बाळासाहेब अभिमन्यु सरोदे
श्री. रमेश नामदेव गोरे
श्री. माणिक बाबासाहेब कदम
श्री. कारभारी राजाराम बाबर
श्री. सुर्यकांत चंद्रकांत काळे
श्री. संतोषकुमार किसनराव राऊत
श्री. आण्णासाहेब रामभाऊ आभाळे
श्री. शिवाजी भगवान कराड
श्री. ज्ञानेश्वर विलासराव शिरसाट
श्री. शशिकांत काशिनाथ जेजुरकर
श्री. कल्याण रावसाहेब लवांडे
श्री. रामेश्वर निवृत्ती चोपडे
श्रीम. सरस्वती पुरूषोत्तम घुले
श्रीम. मिनाज ताजमोहम्मद शेख

## दि. ३१ मार्च २०२३ रोजीचा

| ३१/०३/२०२२ रुपये पैसे | जिंदगी व येणी | ३१/०३/२०२३ रुपये पैसे | ३१/०३/२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **३९६,४२,८७,०९९.२२** | **मागील पानावरुन बेरीज घेतली** | **४४६,४७,९९,५९२.३७** | **४४६,४७,९९,५९२.३७** |
| **९३७,४५,५१,६७१.००** | **सभासद कर्ज व ॲडव्हान्सेस** | | **९८५,१२,६९,४००.००** |
| ९१३,४४,६९,६७५.०० | जामीन कर्ज | ९५४,४८,८०,३४३.०० | |
| ८६,७६,९१६.०० | प्रासंगिक कर्ज | २,०९,७२,७४८.०० | |
| ८,३६,२६,६३९.०० | घर कर्ज | ९,०३,५०,९४०.०० | |
| ४,५८,१७,७१३.०० | ठेव तारण कर्ज | ४,५४,६७,६५३.०० | |
| ९७,६६,१३२.०० | सोनेतारण कर्ज | १,३२,९०,८३५.०० | |
| ३३,६६८.०० | शिक्षण विस्तार अधिकारी कर्ज | ६७,५०५.०० | |
| २७,४१,४०४.०० | सेवानिवृत्त प्राथ. शिक्षक कर्ज | ३२,२३,२७०.०० | |
| १०,२८,१२३.०० | शैक्षणिक कर्ज | ७५,८३,४७६.०० | |
| ७०,८९,११५.०० | कर्मचारी कर्ज | ८४,९२,४०६.०० | |
| ३,००,९३,५९२.०० | वाहणतारण कर्ज | ५,५१,४९,७२२.०० | |
| १०,५७,२२१.०० | कर्मचारी वाहणतारण कर्ज | ७,०६,२३१.०० | |
| ४,६१,८४,१७१.०० | निकड कर्ज | ५,८७,५५,०४६.०० | |
| ३९,६७,३०२.०० | वैद्यकिय कर्ज | २३,२९,२२५.०० | |
| **२,०२,२१,४३०.५०** | **इमारती व डेडस्टॉक** | | **१,७३,६१,०७८.५०** |
| २१,१७,०३८.०० | जागा | २१,१७,०३८.०० | |
| ८३,०४,४६१.५० | इमारती | ७४,३६,१९३.५० | |
| ९०,२६,७२१.०० | डेडस्टॉक | ७०,३५,३२९.०० | |
| ७,७३,२१०.०० | फिक्चर फिटींग व संगणक डेडस्टॉक | ७,७२,५१८.०० | |
| **४,६१,९९,१२९.००** | **येणे व्याज** | | **५,९३,२६,६०३.६७** |
| ७,५३,६५८.०० | थकबाकी कर्जावरील येणे व्याज (OIR) | ६,०९,६३०.०० | |
| ६६,१६,७९२.०० | गुंतवणूकीवरील येणे व्याज | ५१,१८,१३०.०० | |
| ३,८८,२८,६७९.०० | गर्व्हमेंट सिक्यू. गुंत. येणे व्याज | ५,३५,९८,८४३.६७ | |
| **५,७०,४७,५४३.६५** | **इतर येणी** | | **५,३८,०५,०३०.६५** |
| ९१,४७०.०० | विज मंडळ डिपॉझिट येणे | ९८,९६०.०० | |
| ४१,८०९.६५ | फोन डिपॉझिट येणे | ४१,८०९.६५ | |
| ४,०००.०० | नळ डिपॉझिट येणे | ४,०००.०० | |
| ३,७७,८००.०० | कर्ज अर्ज स्टॅम्प ड्युटी येणे | ४,५०,०००.०० | |
| ५,४०,२०,०००.०० | अग्रीम आयकर येणे | ४,८०,००,०००.०० | |
| ५,६९,७११.०० | मालमत्ता अग्रीम विमाहप्ता येणे | ०.०० | |
| ५,५२,५११.०० | अनामत येणे | ३२,५०,०००.०० | |
| १०,०२,०००.०० | स्टाफ दिवाळी ॲडव्हान्स येणे | १०,३६,०००.०० | |
| ३,८८,२४२.०० | शाखा जागा भाडे ॲडव्हान्स येणे | २,९०,३४०.०० | |
| ०.०० | टि.डि.एम. येणे | ६,३३,९२१.०० | |
| **१३४६,२३,०६,८७३.३७** | **एकुण** | **१४४४,६५,६१,७०५.१९** | **१४४४,६५,६१,७०५.१९** |
| **४७,०९,७०८.००** | **DEAF (कॉन्टिजंट लायबिलीटी)** | **४८,५२,०२७.००** | |

**तपासले**

सोबत दिलेल्या लेखापरीक्षण अहवालातील
शेऱ्यांस पात्र राहून बरोबर आहे.

**मे. मालाणी सोमाणी चांडक ॲण्ड असोसिएटस्**
**चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे**

**दिलीप विठ्ठलराव मुरदारे**
मुख्यकार्यकारी अधिकारी

**कैलास इंद्रभान सारोक्ते**
व्हा. चेअरमन

**संदीप युवराज मोटे**
चेअरमन

## शाखांसह एकत्रित नफातोटा पत्रक

| ३१/०३/२०२२ रुपये पैसे | खर्च तपशिल | ३१/०३/२०२३ रुपये पैसे | ३१/०३/२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **७४,९३,६३,५५०.६४** | **दिलेले व्याज** | | ७९,१९,६२,४९४.३२ |
| ७४,९३,६३,५५०.६४ | ठेवीवर दिलेले व्याज | ७९,१९,६२,४९४.३२ | |
| **११,९२,६०,३१६.००** | **कर्मचारी वेतन, भत्ते, प्रा.फंड इ.** | | १०,५४,६९,२१९.०० |
| ७,९७,७७,२३७.०० | कर्मचारी वेतन | ८,४१,०२,९०९.०० | |
| ९४,०४,३९४.०० | कर्मचारी प्रा. फंड संस्था हिस्सा | ९७,३८,७८८.०० | |
| ०.०० | कर्मचारी ड्रेस | ९२,८००.०० | |
| १,५६,७६१.०० | कर्मचारी प्रवास भत्ता | १,३२,१६४.०० | |
| ३०,३२,८०१.०० | कर्मचारी ग्रॅच्युईटी इन्शुरन्स हप्ता | ४५,००,०००.०० | |
| २,६८,८९,१२३.०० | कर्मचारी रजा पगार इन्शुरन्स हप्ता | ६४,०२,५५८.०० | |
| ०.०० | आय.टि. मॅनेजर मानधन | ५,००,०००.०० | |
| **२९,२८,०३८.००** | **संचालक प्रवास भत्ता** | | २५,९१,४१७.०० |
| २९,२८,०३८.०० | संचालक प्रवास भत्ता | २५,९१,४१७.०० | |
| **२,१३,०३,७७८.०४** | **कर, विमा, जागा भाडे इ.** | | २,४०,८२,१०९.४७ |
| ८,४१,९२०.०० | शाखा जागा भाडे | ८,४१,९२०.०० | |
| १,९१,५१२.०० | म्युनिसिपल कर | १,८५,९१३.०० | |
| १,७३,५५,०९५.०० | विमा हप्ता | १,९३,२२,६९४.०० | |
| ८,३१,०४०.०० | लाईट बील | ९,५७,३३०.०० | |
| १८,५२४.०० | लॉकर भाडे | २१,२२३.९८ | |
| २,५१,२२१.४४ | बँक कमिशन व चार्जेस पेड | १,५९,८२५.४३ | |
| ३,५६,१०६.६० | एनपीसीआय कमिशन पेड | ४,३३,७९७.०६ | |
| ५,९६,५०८.०० | जी.एस.टी.पेड | ६,७९,०६६.०० | |
| १०,४२५.०० | बँक व्यवसाय कर | ०.०० | |
| ७,९१,४२६.०० | आयकर पेड | १४,२०,३४०.०० | |
| ६०,०००.०० | डिझास्टर रिकव्हरी सेंटर भाडे | ६०,०००.०० | |
| **५,०५,५३१.००** | **पोस्टेज, फोन इ.** | | २,३४,८९१.०० |
| ७४,४२५.०० | पोस्टेज | ६५,८८६.०० | |
| ४,३१,१०६.०० | फोन बील | १,६९,००५.०० | |
| **१०,२७,६००.००** | **ऑडिट व इन्सपेक्शन** | | १२,७३,६३०.०० |
| ६,५०,०००.०० | कंकरंट ऑडिट फी | ६,५०,०००.०० | |
| ३,५४,०००.०० | VAPT & IS ऑडिट फी | ३,५४,०००.०० | |
| २३,६००.०० | इलेक्ट्रीक ॲण्ड फायर ऑडिट फी | २,६९,६३०.०० | |
| **८,५८,६३९.००** | **छपाई, स्टेशनरी, जाहिरात इ.** | | १०,७३,२५६.०० |
| ३,६४,९६७.०० | छपाई | ५,३२,९८४.०० | |
| २,४४,४७९.०० | स्टेशनरी | २,९८,७२४.०० | |
| २,४९,१९३.०० | जाहिरात | २,४१,५४८.०० | |
| **८९,५२,४७,४५२.६८** | **एकुण बेरीज पुढील पानावर** | **९२,६६,८७,०१६.७९** | **९२,६६,८७,०१६.७९** |

## (दि. १/४/२०२२ ते ३१/३/२०२३ अखेर)

| ३१/०३/२०२२ रुपये पैसे | उत्पन्न तपशिल | ३१/०३/२०२३ रुपये पैसे | ३१/०३/२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **१०५,०१,३९,०६४.०७** | **मिळालेले व्याज** | | १०७,२०,८२,३२५.६३ |
| ८२,५७,५७,१२०.०० | कर्जावरील मिळालेले व्याज | ८०,८३,०३,९२३.०० | |
| ३,५२,६६,३४०.०० | गुंतवणुकीवरील मिळालेले व्याज | २,९७,८६,८८७.०० | |
| १७,८८,२१,१६९.६७ | गर्व्हमेंट सिक्यू. गुंत. मिळालेले व्याज | २१,३९,४८,०५२.३५ | |
| ६७,५३,२८४.४० | एसबीआय म्युच्यु. गुंत. मिळालेले व्याज | २०,००,११३.२८ | |
| ३५,४१,१५०.०० | ट्रेझरी बिल | १,८०,४३,३५०.०० | |
| **१५,७६,२२५.००** | **मिळालेला डिव्हींडंड** | | १६,९७,३५०.०० |
| ८,०९,१००.०० | महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. मुंबई | ८,०९,१००.०० | |
| ७,६७,१२५.०० | अ.नगर जिल्हा सह. बँक लि. | ८,८८,२५०.०० | |
| **३,३६,४४,५००.००** | **गुंतवणुकीवरील नफा** | | १,८३,७३,०००.०० |
| ३,३६,४४,५००.०० | गर्व्हमेंट सिक्युरिटी ट्रेडींग | १,८३,७३,०००.०० | |
| **२५,९२,२८०.९७** | **इतर उत्पन्न** | | २७,६९,४२५.२७ |
| ४,७५,०००.०० | लॉकर भाडे जमा | ६,०५,६००.०० | |
| ५३,६००.०० | प्रोसेसिंग फी जमा | ६०,३००.०० | |
| १,७२,५८०.०० | कर्ज अर्ज विक्री | १,६९,२०५.०० | |
| १,६८०.०० | पारितोषिक अर्ज विक्री | ३,३३५.०० | |
| १८,८१,२२०.९७ | इतर जमा | १९,१७,१२९.२७ | |
| ८,२००.०० | सिबिल रिपोर्ट फि | १,६००.०० | |
| ०.०० | मतदार यादी विक्री | १२,२५६.०० | |
| **१०८,७९,५२,०७०.०४** | **एकुण बेरीज पुढील पानावर** | **१०९,४९,२२,१००.९०** | **१०९,४९,२२,१००.९०** |

## शाखांसह एकत्रित नफातोटा पत्रक

| ३१/०३/२०२२ रुपये पैसे | खर्च तपशिल | ३१/०३/२०२३ रुपये पैसे | ३१/०३/२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **८९,५२,४७,४५२.६८** | **मागील पानावरून बेरीज घेतली** | **९२,६६,८७,०१६.७९** | **९२,६६,८७,०१६.७९** |
| **१,३०,७५०.००** | **देणगी, वर्गणी इ.** | | **१,२७,२१०.००** |
| १,३०,७५०.०० | बँक फेडरेशन वर्गणी | १,२७,२१०.०० | |
| **५६,८३,५४४.००** | **झीज व रिपेअर** | | **५२,३२,०१८.००** |
| ४४,०१,७०९.०० | झीज डेडस्टॉक | ३६,४३,०२२.०० | |
| ४,६६,०००.०० | गर्व्हरमेंट सिक्यूरिटी अमोर्टायझेशन | ७,८१,०००.०० | |
| २,०३,३२१.०० | इलेक्ट्रिक रिपेअर | १,३०,८१५.०० | |
| २,४१,८८५.०० | एटीएम चार्जेस | २,१६,४७८.०० | |
| १,६८,८३६.०० | संगणक देखभाल खर्च | १,८५,९४८.०० | |
| २,०१,७९३.०० | इतर रिपेअर | २,७४,७५५.०० | |
| **४,०९,४५८.००** | **कायदा सल्ला, कोर्ट खर्च** | | **३,४५,८६०.००** |
| ९०,०००.०० | वकील फी | १५,०००.०० | |
| २,२०,८५८.०० | कन्संलटंट फी | २,३७,०००.०० | |
| २३,६००.०० | प्लॅन इस्टिमेट व सुपरव्हीजन फी | ०.०० | |
| ७५,०००.०० | कोर्ट खर्च | ९३,८६०.०० | |
| **१,१३,२४,७८५.४६** | **इतर खर्च** | | **१,४२,२९,६५०.५०** |
| ७,२४,५३४.०० | सर्वसाधारण सभा खर्च | १०,२८,५७५.०० | |
| २,९६,००८.०० | सत्कार समारंभ | ४,४३,६१०.०० | |
| २,४३,५२८.०० | मिटींग व चहापान | २,९२,५०२.०० | |
| २५,६८,३८८.०० | ए.एम.सी. चार्जेस (CBS & other) | २५,४०,२२१.०० | |
| ५३,८०,२००.०० | सुरक्षारक्षक खर्च | ५५,२४,४२९.०० | |
| १५,५४,५३८.०० | कनेक्टिव्हिटी व टेक्नीकल सपोर्ट चार्जेस (CBS) | २४,४८,७९७.०० | |
| ५६,५९६.०० | कोविड खर्च | ०.०० | |
| ०.०० | निवडणूक खर्च | १४,०४,८७६.०० | |
| ०.०० | सरसाई चार्जेस | २,९००.०० | |
| ५,००,९९३.४६ | इतर खर्च | ५,४३,७४०.५० | |
| **७,७५,००,०००.००** | **तरतुदी** | | **५,००,१०,९१०.००** |
| २०,००,०००.०० | शासकिय ऑडिट फी देणे | २०,००,०००.०० | |
| ३०,००,०००.०० | उत्पन्नक्षम जिंदगी अति. निधी | १८,००,०००.०० | |
| १,८५,००,०००.०० | कर्मचारी ग्रॅच्युईटी प्रिमियम देणे | ७९,१०,९१०.०० | |
| ५,४०,००,०००.०० | आयकर देणे | ३,८३,००,०००.०० | |
| **९,७६,५६,०७९.९०** | **नफा** | **९,८२,८९,४३५.६१** | **९,८२,८९,४३५.६१** |
| **१०८,७९,५२,०७०.०४** | **एकूण** | **१०९,४९,२२,१००.९०** | **१०९,४९,२२,१००.९०** |

## (दि. १/४/२०२२ ते ३१/३/२०२३ अखेर)

| ३१/०३/२०२२ रुपये पैसे | उत्पन्न तपशिल | ३१/०३/२०२३ रुपये पैसे | ३१/०३/२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १०८,७९,५२,०७०.०४ | मागील पानावरून बेरीज घेतली | १०९,४९,२२,१००.९० | १०९,४९,२२,१००.९० |
| | | | |
| १०८,७९,५२,०७०.०४ | एकूण | १०९,४९,२२,१००.९० | १०९,४९,२२,१००.९० |

तपासले –

सोबत दिलेल्या लेखापरीक्षण अहवालातील शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे.

**मे. मालाणी सोमाणी चांडक ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंट**

पुणे

| दिलीप विठ्ठलराव मुरदारे | कैलास इंद्रभान सारोक्ते | संदीप युवराज मोटे |
|---|---|---|
| मुख्यकार्यकारी अधिकारी | व्हा. चेअरमन | चेअरमन |

## संचालक मंडळ

श्री. भाऊराव कारभारी राहिंज
श्री. योगेश पोपट वाघमारे
श्री. गोरक्षनाथ जनार्दन विटनोर
श्री. बाळासाहेब बन्सी तापकिर
श्रीम. निर्गुणा रघुनाथ बांगर

श्री. महेंद्र गोरखनाथ भणभणे
श्री. बाळासाहेब अभिमन्यु सरोदे
श्री. रमेश नामदेव गोरे
श्री. माणिक बाबासाहेब कदम
श्री. कारभारी राजाराम बाबर

श्री. सुर्यकांत चंद्रकांत काळे
श्री. संतोषकुमार किसनराव राऊत
श्री. आण्णासाहेब रामभाऊ आभाळे
श्री. शिवाजी भगवान कराड
श्री. ज्ञानेश्वर विलासराव शिरसाट

श्री. शशिकांत काशिनाथ जेजुरकर
श्री. कल्याण रावसाहेब लवांडे
श्री. रामेश्वर निवृत्ती चोपडे
श्रीम. सरस्वती पुरूषोत्तम घुले
श्रीम. मिनाज ताजमोहम्मद शेख

# वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल

## बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट१९४९ (सहकारी संस्थांना लागू असलेला) अन्वये द्यावयाचा दाखला.

आम्ही अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि.अहमदनगर या बँकेचा सोबत जोडलेला दि.३१ मार्च २०२३ अखेरीचा ताळेबंद व त्या संबंधित हिशोबाचा अहवाल खालीलप्रमाणे देत आहोत. आम्ही दिनांक ३१ मार्च २०२३ अखेरीचा ताळेबंद आणि त्याच दिवशी संपणा-या वर्ष अखेरीचे सोबत जोडलेले नफा तोटा पत्रक यांचे लेखापरीक्षण केले आहे.सदरची आर्थिक पत्रके तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनाची असून त्या आर्थिक पत्रकांच्या लेखापरिक्षणावर आधारित आमचे मत व्यक्त करण्याची जबाबदारी आमची आहे.

